**Bachelor of Arts (B.A.) Part–I Semester–II Examination**

**MARATHI**

**Optional – 1**

**(Literature)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** (1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. वाङ्मयाच्या इतर प्रकारांपेक्षा नाटक वाङ्मयप्रकाराचे वेगळेपण सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

विद्यानंदाची व्यक्तिरेखा स्पष्ट करून सांगा. 16

2. नाटक म्हणजे काय ? त्याचे घटक व प्रकार विशद करा.

**किंवा**

लाल्याचे स्वभावचित्र रेखाटा. 16

3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील वाक्यांचे संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा :

**गट–अ**

(क) काय रे, तू प्रिन्सिपॉल व्हायच्या ऐवजी फौजदार का नाही झालास ?

(ख) चूक स्वत:ची असली तरी दुर्जनांची देखील क्षमा मागायला मनाचं औदार्य लागतं.

(ग) अरे, पोट बांधून सरस्वतीची सेवा करणाऱ्या माणसाच्या मागं लक्ष्मीनं उभं रहायचं नाही, तर मग काय किंमत आहे आमच्या श्रीमंतीला आणि काय अर्थ उरलाय आमच्या अधिकाराला ?

(घ) अरे, एका वाल्मीकीचा तू वाटमारी करणारा वाल्या कोळी बनविलास ! बोल, बोल, तुला कशासाठी वाचवू ?

**किंवा**

**गट–आ**

(च) अहो, आपण मराठी माणसानी धंदयात हातपाय पसरायलाच हवेत आता. काय तात्या ?

(छ) माझे आईवडील तशी अगदी देवमाणसं आहेत. पण जगात कसं वागावं हे त्यांना कळलंच नाही. अगदी मूर्ख आहेत ते.

(ज) लाल्या, सुमित्रेन दिलेल्या फुलांतला हाथोडासा प्रसाद घे आणि या फुलासारखा हो! सात्विक, सुंदर, नि प्राजक्तासारखा सुगंधी!

(झ) विधानंद ...... विद्यानंद तोंड झाकून प्रकाशाशी वैर तुम्ही किती दिवस करणार ? तुम्हीच जन्माला घातलेल्या या सूर्याकडं एकदां तरी धीटपणानं डोळे उघडून पाहा... 16

835 835 835 835 835

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा :

**गट—क**

(त) कादंबरीतील घटिते कल्पित असतात, कसे ते सांगा ?

(थ) कादंबरीमध्ये कथनकाराची भूमिका महत्त्वाची असते हे स्पष्ट करा.

(द) चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातील साम्य लिहा.

(ध) आत्मचरित्राची वैशिष्ट्ये थोडक्यात विशद करा.

**किंवा**

**गट—ख**

(प) कादंबरी वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

(फ) कादंबरीतील कल्पित वाचकांना खरेखुरे वाटत असते हे स्पष्ट करा.

(ब) समाज आणि संस्कृती यांच्या घडणीमध्ये साहित्याचा वाटा असतो, कसे ते स्पष्ट करा.

(भ) चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारावरील मूलभूत भेद लिहा. 16

5. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

(i) 'तुझ्याही अश्रूंची आज फुलं झाली आहेत',
असे विद्यानंद का म्हणतात ?

(ii) धर्माप्पाच्या कंपूत शाम का समाविष्ट झाला ?

(iii) प्रा. आरोळे विद्यानंदांना एक नंबरचा मिजासखोर का म्हणतो ?

(iv) कुटप्पावर लाल्या सुरा का उगारतो ?

(v) मराठीतील कोणत्याही चार प्रमुख कादंबरीकारांची नावे लिहा.

(vi) कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण कोणते ? कसे ते सांगा ?

(vii) कात्मकथा व आत्मकथनातील मूलभूत भेद कोणता ?

(viii) चरित्र म्हणजे काय ? मराठीतील आद्य चरित्र ग्रंथ कोणता ? 16